# प्रसिध्दी पत्रक

## आय.ए.एस. परीक्षेच्या मुलाखतीसाठी निःशुल्क प्रशिक्षण-२०१७

“संघ लोकसेवा आयोग” तर्फे घेतल्या गेलेल्या नागरी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७ या परीक्षेचा निकाल दिनांक १० जानेवारी २०१८ रोजी घोषित झाला आहे. या मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होऊन मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यासाठी मा.श्री. विनोदजी तावडे, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकारने **अभिरूप मुलाखत चाचणी-२०१८** कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यासाठी दिल्ली येथे **जुने महाराष्ट्र सदन, कॉपरनिक्स मार्ग, मंडी हाऊस जवळ नवी दिल्ली – ११०००१** मुलाखत सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर वर्षी या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १०.०२.२०१८ ते माहे ०८.०४.२०१८ दरम्यान येणा-या प्रत्येक शनिवार व रविवारी केले जाईल. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. प्रमोद कमलाकर लाखे, संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा प्रशिक्षण संस्था, नागपूर यांची शासनातर्फे नेमणूक झालेली आहे.

महाराष्ट्रतील सर्व विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा फायदा घेण्यासाठी दिनांक १० फेब्रुवारी २०१८ पूर्वी www.iasnagpur.org.in/www.siac.org.in या संकेतस्थळावरील प्रवेश अर्ज भरून मुलाखत प्रशिक्षणकरीता नोंदणी करावी. व directoriasngp@gmail.com या ईमेलवर अर्ज पाठविण्यात यावे. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ०२२ २२०७०९४२ तथा ०७१२ २५६५६२६ या दूरध्वनी क्रमांकवर संपर्क साधावा.

**अर्जासोबत खालील कागदपत्रे सोबत जोडावीत.**

१. युपीएससीचे मुलाखत पत्र

२. डोमेसाईल प्रमाणपत्र

तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने मुलाखतीस येतांना D.A.F. च्या ०६ छायांकीत प्रती न चूकता सोबत आणाव्यात.

**(डॉ. प्रमोद क. लाखे)**
**मुख्य समन्वयक**
**अभिरूप कार्यक्रम २०१७**
**मो.नं. ९४२२१०९१६८**